# रोजगार सूचना

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (म.फु.मा.वि.म.) राज्याच्या अनुसूचित जाती व दुर्बल घटकाच्या विकास व कल्याणासाठी काम करत आहे.

महामंडळाच्या मुंबईतील कार्यालयाकरीता मुख्य वित्तीय सल्लागार, मुख्य विधी सल्लागार, माहिती व जनसंपर्क अधिकारी, अभियंता, लेखा सहाय्यक व विधी सहाय्यक या पदांसाठी १ वर्षाच्या करारतत्वावर नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जदारांनी दि.१२/०९/२०२२ पर्यत अर्ज करावेत. अधिक माहितीकरिता कृपया https://mpbcdc.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

महाव्यवस्थापक (प्रशासन)
म.फु.मा.वि.महामंडळ

# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादीत

दुरध्वनी क्र. ०२२-२६२०२८५२

जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर,
गुलमोहर क्रॉस रोड, क्र. ९,
जे.व्ही.पी.डी. स्कीम,
जुहू, मुंबई – ४०० ०४९
दि.०१/०९/२०२२

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादीत मुंबई यांच्या मुंबईतील कार्यालयासाठी मुख्य वित्तीय सल्लागार, मुख्य विधी सल्लागार, माहिती व जनसंपर्क अधिकारी, अभियंता, लेखा सहाय्यक व विधी सहाय्यक या संवर्गातील पदे १ वर्षाच्या कालावधीकरिता अथवा नियमित कर्मचा-यांची नियुक्ती होईपर्यंत यापैकी अगोदर येणा-या कालावधीपर्यंत पुर्णवेळ करारतत्वावर भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवित आहे.

२. **<u>पदांचा तपशिल/शैक्षणिक/तांत्रिक अर्हता</u>:**

| अ. क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | किमान शैक्षणिक पात्रता | मासिक ठोक परिश्रमिक | आवश्यक पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य वित्तीय सल्लागार | १ | चार्टड अकांउटंट (CA) / आय.सी.डब्लू. ए. (ICWA) | दरमहा रु. ७५,०००/- + कंपनीच्या नियमानुसार वाहतूक भत्ता (सध्या दरमहा रु. ३०,०००) | (१) अर्जदारांस शासकीय / निमशासकीय / मंडळे / महामंडळे / सरकारी उपक्रम अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी किंवा फर्म कार्यालयात वाणिज्य व वित्त क्षेत्राचा प्रशासकीय कामाचा १० वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.<br>(२) अर्जदारांस भांडवल बाजार आणि निधी उभारणीचे व्यवस्थापन आणि मुख्य गुंतवणुक अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या हाताळण्याचे कौशल्य व ज्ञान आवश्यक आहे.<br>(३) अर्जदारांस सांविधानिक कर (आयकर / सेवाकर / व्यावसायिक कर इ.) तसेच खरेदी-विक्री, निविदा प्रक्रिया इत्यादी कामकाजाचे कौशल्य व ज्ञान तसेच अनुभव आवश्यक आहे.<br>(३) अर्जदारांस MS-OFFICE, Microsoft Dynamics, SL, सह प्रगत संगणक कौशल्य याचे ज्ञान असावे.<br>(४) JVs / International JVs / SPVs/ PPPs/ LLP इत्यादीसारख्या विविध प्रकारच्या व्यवसायांचे ज्ञान असावे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | मुख्य विधी सल्लागार | १ | मान्यताप्राप्त विद्यापीठातील कायदयाची पदव्युत्तर पदवी तसेच सनदधारक किंवा सेवानिवृत्त न्यायाधीश | दरमहा रु. ७५,०००/- + कंपनीच्या नियमानुसार वाहतूक भत्ता (सध्या दरमहा रु. ३०,०००) | (१) या पदासाठी वकिली व्यवसायाचा तसेच कंपनी कायदा १९५६, भारतीय कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट १८७२, विद्युत कायदा २००३ इत्यादी विषयातील कामकाजाचा किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.<br>(२) अर्जदारांने सेवाविषयक, प्रशासन अशा सर्व प्रकारच्या कायदयाचे कामकाज हाताळलेले असावे.<br>(३) अर्जदारांस भूधारणा (Land Tenures), मालमत्तेचे हस्तांतरण इत्यादी कामांचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.<br>(४) अर्जदारांस मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल. |
| ३ | माहिती व जनसंपर्क अधिकारी | १ | पत्रकारीता पदवी / जनसंवाद पदवी | कंपनीच्या नियमानुसार | (१) अर्जदारांस शासकीय / निमशासकीय / मंडळे / महामंडळे / सरकारी उपक्रम अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी किंवा फर्म मध्ये जनसंपर्क कार्यात किमान १० वर्षाचा अनुभव.<br>(२) अर्जदारांस मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक.<br>(३) संगणकाचे ज्ञान आवश्यक. |
| ४ | **अभियंता** | | | | |
| | १) विद्युत वाहन व पारंपारिक ऊर्जा | ४ | महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी / तंत्रज्ञानातील बॅचलर पदवी / पदविका प्रथम श्रेणीत उत्तीर्ण (किमान ६० % गुण) | दरमहा रु. ३०,०००/- | (१) इलेक्ट्रीकल अभियांत्रिकी पदवीधारक (Electrical Degree) अर्जदारांस शासकीय / निमशासकीय / मंडळे / महामंडळे / सरकारी उपक्रम अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी किंवा फर्म मधील पारंपारिक उर्जा / विद्युत वाहन चार्जिंग या क्षेत्रातील कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव.<br>(२) इलेक्ट्रीकल अभियांत्रिकी पदविकाधारक (Electrical Diploma) अर्जदारांस शासकीय / निमशासकीय / मंडळे / महामंडळे / सरकारी उपक्रम अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी किंवा फर्म मधील पारंपारिक उर्जा / विद्युत वाहन चार्जिंग या क्षेत्रातील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>(३) अर्जदारांस मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक.<br>(४) संगणकाचे ज्ञान आवश्यक. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २) स्थापत्य अभियंता | ४ | महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील स्थापत्य अभियांत्रिकी पदवी / पदविका प्रथम श्रेणीत उत्तीर्ण (किमान ६० % गुण) | दरमहा रु. ३०,०००/- | (१) स्थापत्य अभियांत्रिकी पदवीधारक (Civil Engineering Degree) अर्जदारांस शासकीय / निमशासकीय / मंडळे / महामंडळे / सरकारी उपक्रम अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी किंवा फर्म मधील किमान २ वर्षाचा अनुभव.<br>(२) स्थापत्य अभियांत्रिकी पदविकाधारक (Civil Engineering Diploma) अर्जदारांस शासकीय / निमशासकीय / मंडळे / महामंडळे / सरकारी उपक्रम अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी किंवा फर्म मधील किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>(३) अर्जदारांस मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक.<br>(४) संगणकाचे ज्ञान आवश्यक. CAD व समकक्ष Software चे ज्ञान व वापराचा अनुभव. |
| | ३) संगणक व माहिती तंत्रज्ञान अभियंता | २ | संगणक / माहिती तंत्रज्ञान / संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी मधील नियमित / अभियांत्रिकी पदवी किंवा संगणक व्यवस्थापन / सिस्टम व्यवस्थापन मधील पदव्युत्तर पदवी. | दरमहा रु. ३०,०००/- | (१) अर्जदारांस सॉफ्टवेअर आणि डेटाबेस प्रोग्रामिंग / सॉफ्टवेअर टेस्टींग / देखभाल, नेटवर्किंग, डेटा सेंटर ऑपरेशन्स यासह क्लाउड ऑपरेशन्स, सॉफ्टवेअर / हार्डवेअर लायसन्सिंग आणि ईआरपी सोल्यूशन मधील सखोल ज्ञान तसेच शासकीय / निमशासकीय / मंडळे / महामंडळे / सरकारी उपक्रम अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी किंवा एखाद्या प्रतिष्ठित संस्था / उद्योगातील प्रत्यक्ष कामाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.<br>(२) अर्जदारांस मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान तसेच संगणक टंकलेखन येणे आवश्यक आहे. |
| ५ | लेखा सहाय्यक | ३ | महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील वाणिज्य शाखेतील पदवी. | दरमहा रु. ३०,०००/- | (१) अर्जदारांस शासकीय / निमशासकीय / मंडळे / महामंडळे / सरकारी उपक्रम अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी किंवा एखाद्या प्रतिष्ठित संस्था / उद्योगातील अद्ययावत लेखा पध्दतीबाबत, लेखा सहाय्यक पदाच्या कामकाजाचा ३ वर्षांचा अनुभव.<br>(२) अर्जदारांस एक्सेलसह मायक्रोसॉफ्ट ऑफिस ऍप्लिकेशन्सचे ज्ञान असावे.<br>(३) अर्जदारांस मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक. |
| ६ | विधी सहाय्यक | १ | महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आणि विधी शाखेची ०३ वर्षाची पदवी | दरमहा रु. ३०,०००/- | (१) अर्जदारांस शासकीय / निमशासकीय / मंडळे / महामंडळे / सरकारी उपक्रम अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी किंवा एखाद्या प्रतिष्ठित संस्था / उद्योगातील कंपनी कायदा १९५६, भारतीय कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट १८७२, विद्युत कायदा २००३ इत्यादी विषयातील |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अथवा १२ वी नंतर ०५ वर्षाची पदवी | | विधीविषयक कामकाजाचा ३ वर्षांचा अनुभव.<br>(२) अर्जदारांस मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक.<br>(३) संगणकाचे ज्ञान आवश्यक. |

४. **<u>पात्रता आणि किमान व कमाल वयोमर्यादा</u>** :

(४.१) भारतीय नागरीकत्व (महाराष्ट्राचे अधिवासी)

(४.२) अर्जदार हा शारीरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुद्ध कोणतेही फौजदारी गुन्ह्याचे प्रकरण सुरु/प्रलंबित नसावे.

(४.३) वर नमूद विवरणपत्रातील अनुक्रमांक १ ते ३ वरील पदांसाठी अर्ज स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

(४.४) तसेच अनुक्रमांक ४ ते ६ वरील पदांसाठी कमाल वयोमर्यादा ३० वर्षे इतकी राहील.

५. वरील सर्व पदांसाठीच्या अटी व शर्ती सोबतच्या **<u>परिशिष्ट-अ</u>** मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

६. विहित नमुन्यातील अर्ज स्वीकारण्याचा शेवटचा दि.१२/०९/२०२२ रोजी संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत आहे. विहीत तारीख/वेळेनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

७. कोणतीही कारणे न देता जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल करणे, पदभरती स्थगित करणे / रद्द करणे व पदभरती प्रक्रिया याबाबतचे सर्व अधिकार तसेच प्राप्त अर्ज अंशतः किंवा पूर्ण किंवा सर्व अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

८. अर्जासोबत कोणतेही मूळ प्रमाणपत्र जोडण्यात येऊ नयेत. मुळ कागदपत्रे मुलाखतीच्या वेळी तपासणीसाठी सादर करणे अनिवार्य आहे.

९. अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रांच्या छायाप्रती जोडण्यात याव्यात. छायाप्रती स्वयंसाक्षांकीत (Self Attested) करण्यात याव्यात. अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती स्पष्ट आणि सुवाच्य असाव्यात. अपात्र / अस्पष्ट प्रती किंवा अंशतः दाखल केलेले / सदोष अर्ज सरसकट नाकारले जातील.

१०. मुलाखतीसाठी/चाचणीसाठी आमंत्रित करण्यात येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता/ निवास भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

११. वरील अनुक्रमांक १ ते ३ वरील पदांबाबत संबंधित अर्जदारांचा त्या क्षेत्रातील अनुभव, ज्ञान, कौशल्य इत्यादीच्या आधारे त्यांच्या मासिक परिश्रमिकामध्ये आपापसातील वाटाघाटीद्वारे वाढ करण्याबाबतचे अधिकार महामंडळ राखून ठेवित आहे.

१२. इच्छुक उमेदवारांनी सोबत जोडलेल्या **<u>परिशिष्ट-ब</u>** नुसार त्यांचे विहीत नमुन्यातील अर्ज, वयाचा दाखला, शैक्षणिक/तांत्रिक पात्रता प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे, मा.महाव्यवस्थापक (प्रशासन), जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड, क्र. ९, जे.व्ही.पी.डी. स्कीम, जुहू, मुंबई - ४०००४९ या पत्यावर टपालाने/कुरीअरद्वारे/स्वहस्ते सादर करावेत. उमेदवारांना अर्जाची आगाऊ प्रत info@mpbcdc.in वर ई-मेलद्वारे पाठवता येईल.

********

## परिशिष्ट-अ

**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादीत मुंबई यांच्या मुंबईतील कार्यालयासाठी मुख्य वित्तीय सल्लागार, मुख्य विधी सल्लागार, माहिती व जनसंपर्क अधिकारी, अभियंता, लेखा सहाय्यक व विधी सहाय्यक या संवर्गातील १ वर्षाच्या कालावधीसाठी अथवा नियमित कर्मचाऱ्यांची नियुक्ती होईपर्यंत यापैकी अगोदर घडणाऱ्या दिनांकापर्यंत पुर्णवेळ करारतत्वावर भरावयाच्या पदांसाठी अटी व शर्ती :**

१) वरील सर्व पदांवरील करारतत्वावरील नियुक्ती म.फु.मा.वि.म.मर्या., च्या मुंबईतील कार्यालयासाठी आहे.

२) प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता/कौशल्य चाचणी इत्यादी अर्हता किमान असून ती धारण केली म्हणून उमेदवार निवडीस पात्र असणार नाही. अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र अर्जदारांची अर्हता, उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभव इत्यादीनुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. तसेच ज्या पदासाठी कौशल्य चाचणी विहीत करण्यात आली आहे त्या पदासाठी कौशल्य चाचणी घेण्यात येईल.

३) जाहीरातीत नमूद वरील पदे ही महामंडळाची नियमीत पदे नसून सदरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर नियुक्ती देण्यात येणाऱ्या अर्जदारांना या पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदांसाठी शासनाचे/महामंडळाचे/कंपनीचे सेवा नियम लागू राहणार नाहीत. त्याचप्रमाणे अर्जदाराला महामंडळामध्ये नियमित सेवेत सामावून घेणे किंवा सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

४) निवड झालेल्या अर्जदारांची नियुक्ती ही संबंधित उमेदवार त्याची निवड करण्यात आलेल्या पदावर हजर झाल्याच्या दिनांकापासून, १ वर्षाच्या अथवा नियमित कर्मचारी उपलब्ध होईपर्यंत यापैकी अगोदर घडणाऱ्या दिनांकापर्यंत कालावधीसाठी राहील.

५) पूर्णवेळ कराराच्या आधारावर निवडलेल्या अर्जदारांना वर नमूद प्रमाणे दरमहा एकत्रित मानधन दिले जाईल. निवडलेल्या अर्जदारांना महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, गणवेश भत्ता, अतिकालीक भत्ता, वैद्यकीय प्रतिपूर्ती, दूरध्वनी इत्यादी सारखे कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

६) वरीलप्रमाणे निवड करण्यात येणाऱ्या अर्जदारांचा करार सुरुवातीला जास्तीत जास्त १ वर्षाच्या कालावधीसाठी असेल आणि महामंडळाची आवश्यकता, अर्जदाराच्या कार्यक्षमतेचे मुल्यांकन आणि त्यांच्या वैद्यकीय तंदुरुस्तीच्या अधीन राहून सदर करार पुढे वाढवला जाऊ शकतो.

७) अर्जदारास एकापेक्षा जास्त पदाकरीता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

८) निवडलेल्या अर्जदारांना (पूर्णवेळ) सामान्य कार्यालयीन वेळा पाळणे आवश्यक आहे आणि त्यांना शनिवार, रविवार सुट्टीच्या दिवशी किंवा आवश्यक असल्यास कोणत्याही सुट्टीसह कार्यालयीन वेळेच्या पलीकडे कार्यालयात उपस्थित राहण्यास सांगितले जाऊ शकते.

९) करार तत्वावर पूर्णवेळ निवडलेल्या अर्जदारांना बायोमेट्रिक/उपस्थिती नोंदवहीमध्ये त्यांची उपस्थिती नोंदविणे अनिवार्य आहे अन्यथा त्यांच्या त्या दिवसाच्या मानधनात कपात केली जाऊ शकते.

१०) करार तत्वावर पूर्णवेळ निवडलेल्या अर्जदारांना शनिवार/रविवारची सुट्टी आणि नियुक्ती झालेल्या करार कालावधीत आठ दिवसांची नैमितिक रजा अनुज्ञेय आहे. अनुज्ञेय आठ दिवसांहून अधिक काळ गैरहजर राहिल्यास त्यांना सदर गैरहजर कालावधीत कोणतेही मानधन अनुज्ञेय असणार नाही. तसेच करार कालावधीत न उपभोगलेल्या नैमितिक रजा पुढील करार कालावधीत समाविष्ट केल्या जाणार नाहीत किंवा रजा रोखीकरणासाठी पात्र होणार नाहीत.

११) अर्जदारांना देय असलेल्या मानधनावर शासनाच्या नियमानुसार प्राप्तिकर किंवा इतर कोणताही कर TDS द्वारे कपात केला जाईल व त्याबाबतचे आवश्यक TDS प्रमाणपत्र संबंधित अर्जदारांना दिले जाईल.

१२) निवड झालेल्या अर्जदारांना निवड यादीतील गुणानुक्रमांकाच्या आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल तसेच याबाबत अर्जदारांनी कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर अर्जदाराची निवड रद्द करण्यात येईल.

*******

# परिशिष्ट-ब

फोटो

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादीत मुंबई यांच्या मुंबईतील कार्यालयासाठी मुख्य वित्तीय सल्लागार, मुख्य विधी सल्लागार, माहिती व जनसंपर्क अधिकारी, अभियंता, लेखा सहाय्यक व विधी सहाय्यक या संवर्गातील १ वर्षाच्या कालावधीसाठी अथवा नियमित कर्मचाऱ्यांची नियुक्ती होईपर्यंत यापैकी अगोदर घडणाऱ्या दिनांकापर्यंत पुर्णवेळ करारतत्वावर भरावयाच्या पदांसाठी अर्ज :

| | |
|---|---|
| संपूर्ण नाव | |
| जन्मतारीख | |
| संपर्काचा पत्ता | |
| कायमचा पत्ता | |
| मोबाईल क्र. | |
| ई-मेल | |
| आधार कार्ड क्र. | |
| पॅनकार्ड क्र. | |
| अर्ज सादर केलेल्या पदाचे नाव | |
| शैक्षणिक पात्रता | |
| तांत्रिक अर्हता / कौशल्य अर्हता | |
| अनुभव | |
| इतर माहिती | |

वरीलप्रमाणे सादर केलेली माहिती खरी आहे. मी सादर करीत असलेल्या पदाच्या सर्व अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. त्यानुसार हा अर्ज मी सादर करीत आहे. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता / तांत्रिक अर्हता / कौशल्य अर्हता / अनुभव प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांच्या स्वयंस्वाक्षरी केलेल्या छायाप्रती सोबत जोडल्या आहेत.

नाव व स्वाक्षरी / दिनांक

******